MHAM140000732026

दि.कि.अ.क्र.२८/२०२६
शांता वि- निरंक

## निशाणी क्र.०१ खालील आदेश

**(आदेश दि.०५.०५.२०२६)**

०१. अर्जदाराने सदरचा अर्ज हा मुंबई रेग्युलेशन नंबर VIII १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलला आहे.

०२. मयत लक्ष्मण मोती दहीकर यांचे अर्जदार ही मुलगी आहे. लक्ष्मण मोती दहीकर यांचा मृत्यु दि.२८/११/२०२३ रोजी सावलीखेडा, ता. धारणी, जि.अमरावती येथे झालेला आहे. मयत लक्ष्मण मोती दहीकर यांची पत्नी कमलाबाई लक्ष्मण दहीकर यांचा मृत्यू दिनांक २०/०९/२००७ रोजी सावलीखेडा, ता. धारणी, जि. अमरावती येथे झालेला आहे. मयत लक्ष्मण मोती दहीकर यांचे अर्जदार हे वारस आहे. अर्जदारास कार्यालयीन व वैयक्तीक कामाकरीता वारस दाखल्याची आवश्यकता आहे.

०३. अर्ज दाखल केल्यानंतर जाहिर प्रगटन व सायटेशन नोटीसचा आदेश करण्यात आला. त्याप्रमाणे "दै.विदर्भ की दहाड" या दैनिकामध्ये दि.०२/०४/२०२६ रोजी नि.क्र.१३ प्रमाणे जाहिर प्रगटन देण्यात आले. जाहिरनामा निशाणी क्र.६ हा ग्राम पंचायत सावलीखेडा, तहसिल कार्यालय धारणी व न्यायालयाचे सुचना फलकावर अडकवण्यात आला, आजपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही.

०४. अर्जदाराने दाखल केलेला अर्ज कागदपत्रे व साक्षीपुरावा पाहिला. अर्जदाराने सदरचा अर्ज हा मुंबई रेग्युलेशन नंबर VIII १८२७ चे कलम २ व ७ प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणेसाठी दाखल केलेला आहे. अर्जदार यांनी निशाणी क्र.०९ प्रमाणे सरतपासणीचे शपथपत्र दाखल केलेले आहे. शपथपत्रामध्ये साक्षिदाराने मुळ अर्जा प्रमाणे कथन केलेले आहे. अर्जदाराने निशाणी क्र. १० वर लक्ष्मण मोती दहीकर यांचा मृत्युचा दाखला दाखल केलेला आहे. निशाणी क्र. ११ वर कमलाबाई लक्ष्मण दहीकर यांचा मृत्युचा दाखला दाखल केलेला आहे. नि.क्र.१२ वर अर्जदाराचा आधारकार्डाची सत्यप्रती जोडली आहे.

०५. निशाणी क्र निशाणी क्र. १० वरील लक्ष्मण मोती दहीकर यांचे मृत्युप्रमाणपत्राचे अवलोकन केले असता असे दिसुन येते की, लक्ष्मण मोती दहीकर यांचा मृत्यु

MHAM140000732026

दि.कि.अ.क्र.२८/२०२६
शांता वि- निरंक

दि.२८/११/२०२३ रोजी सावलीखेडा, ता. धारणी, जि.अमरावती येथे झालेला आहे. अर्जदाराचा पुरावा हा आव्हानीत केलेला नाही. जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्यानंतर आजपावेतो कोणीही हरकत नोंदविलेली नाही. अर्जदाराच्या वतीने दिलेला तोंडी व कागदोपत्री पुरावा विचारात घेता, अर्जदार हे मयत लक्ष्मण मोती दहीकर यांचे वर्ग १ चे कायदेशिर वारस आहे, असे औपचारीकरित्या जाहिर करुन वारस प्रमाणपत्र देण्यात येणे योग्य व न्यायोचित आहे. त्यामुळे मी खालीलप्रमाणे आदेश पारित करीत आहे.

## आदेश

१. अर्ज मंजूर करण्यात येतो.

२. मयत लक्ष्मण मोती दहीकर यांना अर्जदार शांता चतुरसिंग मावस्कर (मुलगी) हे औपचारीकरित्या कायदेशिर वारस असलेबाबत प्रमाणपत्र आवश्यक ती कोर्ट फि घेवून अर्जदारास देण्यात यावे.

३. अर्जदाराला असेही आदेशीत करण्यात येते की, त्यांनी वारस दाखल्याच्या आधारे त्यांना मिळणा-या मयतांच्या नावावर असलेल्या सर्व स्थावर आणि जंगम मिळकतीचा (immovable and movable properties) सविस्तर खुलासा या न्यायालयात सादर करावा व मयताकडुन प्राप्त झालेल्या सर्व मिळकतीचे सविस्तर वर्णन वारस दाखला मिळाले पासुन या न्यायालयात सहा महिन्यात दाखल करावे. तसेच, त्यांनी कोणत्या मिळकतींची विल्हेवाट लावली असल्यास त्यास खुलासा एक वर्षात सादर करावा, तसे न केल्यास अर्जदार हे भारतीय वारसाहक्क कायदा XXXIX, १९२५ चे कलम ३१७ व ३९० नुसार भारतीय दंड विधान कलम – १७६ अन्वये दंडास पात्र ठरतील.

अर्जदाराने दिवाणी मॅन्युअल परिच्छेद ३१२ प्रमाणे पुर्तता करावी.

ADITYA AJAY CHAVAN

Digitally signed by ADITYA AJAY CHAVAN
Date: 2026.05.06 10:51:08 +0530

( ए. ए. चव्हाण )
सह दिवाणी न्यायधिश, क.स्तर,
धारणी

दि. ०५/०५/२०२६

MHAM140000732026

दि.कि.अ.क्र.२८/२०२६
शांता वि- निरंक

Certificate

I affirmed that, the contents of this PDF file order is same word to word as per original order.

| | | |
|---|---|---|
| Name of Stenographer | : | Shri. A. K. Pawar, |
| Court Name | : | Shri. A. A. Chavan<br>Jt. C.J.J.D., Dharni. |
| Order signed by P.O. | : | 05.05.2026. |
| Order uploaded on | : | 06.05.2026. |